**कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**स्थायी समिती सभा क्र.१६ सन २०२३/२४**
**स्थायी समिती सभा मंगळवार, दिनांक १६/०५/२०२३**

---

## कार्यवृत्तांत

कोल्हापूर जिल्हा परिषदेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १६.०५.२०२३ इ.रोजी दुपारी १२.३० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो,जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे दालनात प्रत्यक्षात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे आहे.

येणेप्रमाणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक, तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी सभेस उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**सचिव :-** सर्वांना नमस्कार. कोल्हापूर जिल्हा परिषदेची प्रशासक कालावधीतील सभा आज मंगळवार दिनांक १६.०५.२०२३ इ.रोजी आयोजित केली आहे. आजच्या सभेसाठी उपस्थित असलेले जिल्हा परिषदेचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक सो, मा.अति मुख्य कार्यकारी अधिकारी सो, मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. कोल्हापूर तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करते. व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक,यांच्या मान्यतेने सभा कामकाजास सुरवात करते.

**विषय क्र.१ :-** स्थायी समिती सभा दिनांक १८/०४/२०२३ इ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे. **(सा.प्र)**

**सचिव-** सर्व खातेप्रमुखाना मागील आठवडयातच सदर सभेचा कार्यवृतांत पाठविणेत आलेला आहे. याबाबत कोणत्या विभागाची काही अडचण आहे का ?

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** कोणत्याही विभागाची सदर कार्यवृतांता बाबत काही आक्षेप नाही असे समजून कार्यवृतांत कायम करणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १९१** **दिनांक १६-०५-२०२३**

स्थायी समिती सभा दिनांक १८/०४/२०२३ इ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली होती. सदर स्थायी समिती सभेच्या इतिवृतांचे सभागृहात वाचन करणेत येवून सर्वानुमते इतिवृत्त कायम करणेबाबतचा ठराव पारीत करणेत आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२ :-** सप्ताहामध्ये प्राप्त झालेल्या महत्वाचे शासन निर्णय परिपत्रके वाचन करणे.

**सचिव -** १.उप सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.१२७/आस्था-१४ दि.१६/०५/२०२३ रोजीचे सन २०२३-२४ मधील जिल्हा परिषदेतील गट-क(वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचा-यांच्या बदल्या करण्याबाबतच्या सूचनांचे वाचन करण्यात आले.

२.ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था ८ दि.१५/०५/२०२३ रोजीचे जिल्हा परिषद अंतर्गत गट-क मधील सर्व संवर्गातील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेची रिक्त पदे भरण्याबाबत मार्गदर्शक सूचनांचे वाचन करण्यात आले.

**विषय क्र.३ :-** माहे एप्रिल २०२३ ची जमा व खर्चाची प्रपत्र मंजूरीबाबत.**(वित्त)**

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** माहे फेब्रुवारी २०२३ च्या जमा व खर्चाच्या प्रपत्रांना मंजूरी बाबतचा विषय आहे. माहे फेब्रुवारी अखेर हस्तांतरण जमा तपशील रक्कम रु. ९१४१७६३७५/-असून खर्च रक्कम

रुपये ८३१०१६९३९/- इतका आहे. अभिकरण योजना जमा रक्कम रु.निरंक असून खर्च रक्कम रुपये निरंक आहे. तसेच जि.प स्वनिधि जमा रक्कम रु.३०३०१९०६६/-इतकी असून खर्च रक्कम रु.४८६९३२/- इतका आहे.तरी सदर विषयास मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** मंजूरी देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १९२** **दिनांक १६-०५-२०२३**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे एप्रिल २०२३ ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करणेत आली. वित्त समितीने दिनांक ०२.०५.२०२३ ने केलेल्या शिफारशीनुसार त्यास मंजूरी देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.४ :-** शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुट्टी मशीन पुरविणे (नाविण्यपूर्ण) योजना ही योजना राबविणेस स्थायी समिती मार्फत जि.प.सभेची मान्यता मिळणेबाबत **(कृषी)**

**कृषी विकास अधिकारी -** शेतक-यांना ५० % अनुदानावर पाचटकुट्टी मशीन पुरविणे ही योजना राबविणेस मान्यता मिळणेबाबतचा विषय होता.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १९३** **दिनांक १६-०५-२०२३**

शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुटटी मशीन पुरविणे (नाविण्यपूर्ण योजना) योजना सन २०२३-२४ मध्ये कृषि समितीकडील ठराव क्रं ०९ दिनांक २१/०४/२०२३ अन्वये बजेट पुर्न्नविनियोजन व्दारे अंतिम करणेत आलेली तरतूद र.रु ४२,९९,०००/- मधून (नाविण्यपुर्ण ) योजना राबविणेस या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे

सदरील सन २०२३-२०२४ मध्ये जि.प.अर्थ सकंल्पात शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुटटी मशीन पुरविणे ( नाविण्यपूर्ण ) योजनेचे नवीन हेड तयार करुन योजना राबविणेस कृषि समिती कडील ठराव क्र १४ दि. २१/०४/२०२३ अन्वये मान्यता दिली असून सदरच्या विषय जि.प. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करणे कामी स्थायी समिती सभा शिफरस करीत आहे.

| अ.नं | सन २०२३-२०२४ मध्ये राबविण्यात येणा-या नाविण्यपूर्ण योजनेचे नाव | सन २०२३-२०२४ मध्ये जि.प.अर्थ सकंल्पात मंजूर तरतूद र.रु | कृषि समितीकडील ठराव क्रं ०९ दिनांक २१/०४/२०२३ अन्वये बजेट पुर्नविनियोजनाव्दारे अंतिम करणेत केलेली तरतूद र.रु |
|---|---|---|---|
| ०१ | शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुटटी मशीन पुरविणे ( नाविण्यपूर्ण योजना) | ००-०० | ४२,९९,०००/- |

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.५ :-** लोकराजा राजर्षी शाहू महाराज सेंद्रीय शेती प्रोत्साहन योजना ही योजना राबविणेस तांत्रिक, प्रशासकिय व अनुदान खर्चास स्थायी समिती मार्फत जि.प.सभेची मान्यता मिळणेबाबत **(कृषी)**

**कृषी विकास अधिकारी -** लोकराजा राजर्षी शाहू महाराज सेंद्रीय शेती प्रोत्साहन योजना राबविणेस तांत्रिक, प्रशासकिय व अनुदान खर्चास मान्यता मिळणेबाबतचा विषय होता.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक -१९४** **दिनांक १६-०५-२०२३**

सन २०२३-२४ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातून लोकराजा राजर्षी शाहू महाराज सेंद्रीय शेती प्रोत्साहन योजना या योजनेसाठी अनुदान रक्कम रुपये ५०.०० लाखाची आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. सदर तरतुदीमधुन किटकनाशक उर्वरीत अंशमुक्त भाजीपाला व जीवामृत प्लस, राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम , गांडुळ खत व कल्चर त्याच प्रमाणे सदर योजनेची अंमल बजावणी करीता शेतकरी व अधिकारी यांना प्रशिक्षण व व्यापक प्रसिध्दी साठी शेतक-यांना दिनांक ५ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार थेट लाभ हस्तांतरण (DBT) कार्यप्रणालीप्रमाणे अनुदान देणेत येणार आहे.

ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त९/दि. ७ ऑक्टोंबर २०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता (भाग-२) व तांत्रिक मान्यता (भाग-४) नुसार देणेचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला आहेत.तरी जि.प.सेस फंड अंर्तगत सन २०२३-२४ मधुन लोकराजा राजर्षी शाहू महाराज सेंद्रिय शेती प्रोत्साहन योजनेसाठी ५०% अनुदानावर एकुण खर्च र.रु ५०,००,,०००/- इतका येणार आहे. तरी वरीलप्रमाणे ५०% अनुदानावर शेतकऱ्यांना रक्कम रुपये ५०.०० लाख तरतुदी मधुन योजना राबविणेस, प्रशासकीय, तांत्रिक तसेच खार्चास कृषि समिती कडील ठराव क्र ०६ दि. २१/०४/२०२३ अन्वये मान्यता देणेकामी शिफारस केली आहे. तरी सदरच्या विषयास स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.६** :- सन २०२३-२४ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातून थेट लाभ हस्तांतरण (DBT) कार्यप्रणाली कामी ५०% अनुदानावर शेतक-यांना सुधारीत औजारे पुरविणे (पंप) जलसिंचन साधने पुरविणे (इले.मोटर/इंजिन) या योजनेवरील तरतूद र.रु.४३.०० लाख या योजनेवरील तरतूद शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुट्टी मशीन पुरविणे या (नाविण्यपूर्ण योजना) योजनेवर पुर्नविनियोजनाव्दारे वर्ग करणे बाबत. **(कृषी)**

**कृषी विकास अधिकारी -** र.रु.४३.०० लाख या योजनेवरील तरतूद शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुट्टी मशीन पुरविणे या योजनेवर पुर्नविनियोजनाव्दारे वर्ग करणे बाबतचा विषय होता.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक -१९५** **दिनांक १६-०५-२०२३**

जिल्हा परिषद कोल्हापूर वित्त विभागाकडील सन २०२३-२०२४ चे मुळ अंदात्रपत्राकिय तरतूदीनुसार जिल्हा परिषद सेस फंडातून ५०% अनुदानावर शेतकऱ्यांना सुधारीत औजारे पुरविणे (पंप) जलसिंचन साधने पुरविणे (इले.मोटर/इंजिन ) या योजनेवरील तरतूद र.रु ४३-०० लाख इतकी तरतूद मंजूर करणेत आलेली आहे.

सन २०२३-२४ मध्ये सदरची योजना न राबवता या योजनेवरी तरतूद नव्याने राबविण्यात येणारी योजना शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुटटी मशीन पुरविण या ( नाविण्यपूर्ण योजना) या योजनेवर पुर्नविनियोजने व्दारे वर्ग करणेतबाबत मा. प्रशासक जि.प.कोल्हापूर यांनी सुचविले प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी जिल्हा परिषद कोल्हापूर वित्त विभागाकडील सन २०२३-२०२४ चे मुळ अंदात्रपत्राकिय तरतूदीनुसार जिल्हा परिषद सेस फंडातून ५०% अनुदानावर शेतकऱ्यांना सुधारीत औजारे पुरविणे (पंप) जलसिंचन साधने पुरविणे (इले.मोटर/इंजिन ) या योजनेवरील तरतूद र.रु ४३-०० लाख इतकी तरतूद मंजूर करणेत आलेली असून सन २०२३-२४ मध्ये सदरची योजना रदद करुन या योजनेवरील तरतूद नव्याने

राबविण्यात येणारी योजना शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुटटी मशीन पुरविणे या (नाविण्यपूर्ण योजना) या योजनेवर पुर्नविनियोजनेव्दारे वर्ग करणेस कृषि समिती कडील ठराव क्र.९ दि.२१/०४/२०२३ अन्वये मान्यता दिली असून सदरच्या विषय जि.प. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करणे कामी स्थायी समिती सभा शिफरस करीत आहे.

| अंदाजपत्रकीय बाब व लेखा शिर्ष | प्रथम सुधारित अंदाजपत्राव्दारे मंजूर तरतूद | पुर्नविनियोजीत करावयाची रक्कम रुपये | | पुर्नविनियोजनाव्दारे उपलबध होणारी सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|
| | | कमी | जास्त | |
| ५० % अनुदानावर शेतकऱ्यांना सुधारीत औजारे पुरविणे (पंप) जलसिंचन साधने पुरविणे (इले.मोटर/इंजिन) पुरविणे | ४३,००,०००/- | ४२,९९,००० | --- | १०००/- |
| शेतक-यांना ५०% अनुदानावर पाचटकुटटी मशीन पुरविणे (नाविण्यपूर्ण योजना) | ००-०० | - | ४२,९९,००० | ४२,९९,०००/- |
| एकूण- | ४३,००,०००/- | -- | -- | ४३,००,०००/- |

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.७ :-** मौजे चंद्रे, ता.राधानगरी येथील समाज मंदिर इमारत निर्लेखन करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** मौजे चंद्रे ता.राधानगरी येथील समाज मंदिर इमारत निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अधिक्षक अभियंता सा.बां मंडळ कोल्हापूर यांचेकडून प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १९६** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत चंद्रे, ता.राधानगरी येथील समाज मंदिर इमारत निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत चंद्रे यांचेकडून पंचायत समिती, राधानगरी यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर समाज मंदिर इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नं २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत चंद्रे, ता.राधानगरी यांनी मासिक सभा ठराव क्रं २२ दि.१४/१२/२०२१ व ग्रामसभा ठराव क्र. १३ दि. २/१०/२०२१ ने सदर इमारत सन १९९७-९८ मध्ये बांधली असून ती जुनी व नादुरूस्त झालेमुळे निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ११ दि. ०६/०९/२०२२ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.DOT/Consultancy &Testing Cell/४२४० दि.२०/३/२०२२ ने सादर केलेला आहे.

अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.अअ (को)/रेशा/१३८९/ सन २०२३ दि. १३/०३/२०२३ ने चंद्रे येथील समाज मंदिर निर्लेखन करणेबाबतचे यांचे प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच सदर समाज मंदिर इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत

मौजे चंद्रे, ता. राधानगरी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.८ :-** मौजे चंद्रे, ता.राधानगरी येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** मौजे चंद्रे ता.राधानगरी येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अधिक्षक अभियंता सा.बां मंडळ कोल्हापूर यांचेकडून प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १९७** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत चंद्रे, ता.राधानगरी येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत चंद्रे यांचेकडून पंचायत समिती, राधानगरी यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नं २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत चंद्रे, ता.राधानगरी यांनी मासिक सभा ठराव क्रं २३ दि.१४/१२/२०२१ व ग्रामसभा ठराव क्र. १३ दि.०२/१०/२०२१ ने सदर इमारत सन १९६६ मध्ये बांधली असून ती जुनी व नादुरूस्त झालेमुळे निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं १० दि. ०६/०९/२०२२ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.DOT/Consultancy &Testing Cell/४२४१ दि.२०/३/२०२२ ने सादर केलेला आहे.

अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.अअ (को)/रेशा/१३८९/ सन २०२३ दि. १३/०३/२०२३ ने चंद्रे येथील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणेबाबतचे यांचे प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे चंद्रे, ता. राधानगरी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.९ :-** मौजे तळगांव, ता.राधानगरी येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** मौजे तळगांव ता.राधानगरी येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अधिक्षक अभियंता सा.बां मंडळ कोल्हापूर यांचेकडून प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १९८** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत तळगांव, ता. राधानगरी येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत तळगांव यांचेकडून पंचायत समिती, राधानगरी यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नं २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत तळगांव ता.राधानगरी यांनी मासिक सभा ठराव क्रं ०८ दि.२०/१२/२०२१ व ग्रामसभा ठराव क्र. १०/४ दि. २०/११/२०२१ ने सदर इमारत सन १९७४ मध्ये बांधली असून ती जुनी व नादुरूस्त झालेमुळे निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं १२ दि. ०६/०९/२०२२ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.DOT/Consultancy &Testing Cell/४४४० दि.०३/१/२०२२ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र./बाखा/रेशा/वशि/१४/२०२३ दि.२४/०४/२०२३ ने तळगांव येथील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणेबाबतचे अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचे प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे तळगांव, ता. राधानगरी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१० :-** मौजे जाखले, ता.पन्हाळा येथील समाज मंदिर इमारत निर्लेखन करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** मौजे जाखले ता.पन्हाळा येथील समाज मंदिर इमारत निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अधिक्षक अभियंता सा.बां मंडळ कोल्हापूर यांचेकडून प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - १९९** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत जाखले, ता. पन्हाळा समाज मंदिर इमारत निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत जाखले यांचेकडून दि. १९/१०/२०२२ रोजी पंचायत समिती, पन्हाळा यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर समाज इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नं २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत जाखले ता.पन्हाळा यांनी मासिक सभा ठराव क्रं १४२ दि.२४/०३/२०२१ व ग्रामसभा ठराव क्र. ६२ दि. २६/०१/२०२० ने सदर इमारत सन १९८६ मध्ये बांधली असून ती जुनी व नादुरूस्त झालेमुळे निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ८२८ दि. ३०/०१/२०२३ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट Outward No./SU/DOT/Civil Engg/३९८९ दि.१८/१०/२०२२ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र./बाखा/रेशा/वशि/८/२०२३ दि. २४/०४/२०२३ ने जाखले येथील समाज मंदिर इमारत निर्लेखन करणेबाबतचे अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचे प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या समाज मंदिर इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे जाखले, ता.पन्हाळा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.११ :-** मौजे जिऊर, ता.पन्हाळा येथील मातंग समाज मंदिर इमारत निर्लेखन करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** मौजे जिऊर ता.पन्हाळा येथील मातंग समाज मंदिर इमारत निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अधिक्षक अभियंता सा.बां मंडळ कोल्हापूर यांचेकडून प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २००** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत जिऊर, ता.पन्हाळा मातंग समाज मंदिर इमारत निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत जिऊ र यांचेकडून दि. २४/०५/२०२२ रोजी पंचायत समिती, पन्हाळा यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर समाज मंदिर इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नं २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत जिऊ र ता.पन्हाळा यांनी मासिक सभा ठराव क्रं २६/०१ दि.२९/०४/२०२१ व ग्रामसभा ठराव क्र. ५३ ने सदर इमारत सन १९८१ मध्ये बांधली असून ती जुनी व नादुरूस्त झालेमुळे निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ८२४ दि. ३०/०१/२०२३अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट OutwardNo/SU/DOT/Civil Engg./३६९७ दि. ०२/०५/२०२२ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र./बाखा/रेशा/वशि/६/२०२३ दि.२४/०४/२०२३ ने जिऊ र येथील मातंग समाज मंदिर इमारत निर्लेखन करणेबाबतचे अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचे प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या समाज मंदिर इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे जिऊर, ता.पन्हाळा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१२ :-** मौजे पोखले, ता.पन्हाळा येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** मौजे पोखले ता.पन्हाळा येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शासकिय तंत्रनिकेतन कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अधिक्षक अभियंता सा.बां मंडळ कोल्हापूर यांचेकडून प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०१** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत पोखले, ता.पन्हाळा ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत पोखले यांचेकडून दि.१९/०८/२०२२ रोजी पंचायत समिती, पन्हाळा यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नं २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत पोखले ता.पन्हाळा यांनी मासिक सभा ठराव क्रं ५९ दि.०८/०८/२०२२ व ग्रामसभा ठराव क्र. ०७ दि. २४/०४/२०२२ ने सदर इमारत सन १९९० व २०१० मध्ये बांधली असून ती जुनी व नादुरूस्त झालेमुळे निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ८२३ दि. ३०/०१/२०२३अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट GPKP/AMD/२०२२/२७०३ दि. १७/०८/२०२२ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र./बाखा/रेशा/वशि/९/२०२३ दि. २४/०४/२०२३ ने पोखले येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबतचे अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचे प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे पोखले, ता. पन्हाळा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा<br>
प्रशासक<br>
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१३ :-** ग्रामपंचायत मौजे मुदाळ ता.भुदरगड येथील जुनी दगडी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** ग्रामपंचायत मौजे मुदाळ ता.भुदरगड येथील जुनी दगडी पाण्याची टाकी निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू) जि.प.कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०२** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत मुदाळ ता. भुदरगड येथील जुनी दगडी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत मुदाळ यांचेकडून पंचायत समिती, भुदरगड यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर पाण्याचा टाकीचा ७/१२ उतारा प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत मुदाळ ता. भुदरगड यांनी मासिक सभा ठराव क्र..९ दि. २२/०४/२०२२ व सदर टाकी १९८३ मध्ये बांधली असून ती

जीर्ण झाली असलेने व सदर टाकीमध्ये पाणीसाठी होत नसलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ३४ दि. ११/११/२०२२ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.DOT/Consultancy &Testing Cell/४३४१ दि. ०६/०७/२०२२ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजिप/ग्रापापु/ कावि-७/३५१/२०२१ दि. १३/०३/२०२३ ने ग्रामपंचायत मुदाळ येथील पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे मुदाळ, ता. भुदरगड विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१४ :-** ग्रामपंचायत कुंभोज ता.हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखनाबाबत.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** ग्रामपंचायत कुंभोज ता.हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू) जि.प.कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०३** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत कुंभोज ता. हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत कुंभोज यांचेकडून दि ०७/०४/२०२१ रोजी पंचायत समिती, हातकणंगले यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर पाण्याचा टाकीचा असेसमेंट उतारा व नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत कुंभोज ता. हातकणंगले यांनी मासिक सभा ठराव क्रं ५८ दि. १९/०३/२०२१ व ग्रामसभा ठराव क्र ४५/१ सदर टाकी १९७८/८० मध्ये बांधली असून बरेच वर्षे झाली पाण्याविना न वापरता पडून आहे तसेच सदर टाकीचा वापर नसलेने कोणत्याही क्षणी पडण्याची शक्यता असलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ३९४ दि. १७/०३/२०२१ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विदयापीठ यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.DOT/Consultancy &Testing Cell/ दि.३१/०३/२०२१ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजिप/ग्रापापु/ कावि-८/३५०/२०२३ दि. ०१/०३/२०२३ ने ग्रामपंचायत कुंभोज येथील पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे कुंभोज, ता. हातकणंगले विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१५ :-** मौजे गवसे, ता.चंदगड येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** मौजे गवसे ता.चंदगड येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शासकिय तंत्रनिकेतन कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अधिक्षक अभियंता सा.बां मंडळ कोल्हापूर यांचेकडून प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०४** **दिनांक १६-०५-२०२३**

ग्रामपंचायत गवसे, ता. चंदगड येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत गवसे यांचेकडून पंचायत समिती, चंदगड यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत गवसे, ता.चंदगड यांनी मासिक सभा ठराव क्रं ५१ दि.२९/०९/२०२१ ने सदर इमारत सन १९६०-६१ मध्ये बांधली असून ती जुनी व नादुरूस्त झालेमुळे निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ९६ दि. ११/०१/२०२२ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.GPKP/AMD/२०२१/४३६७ दि.१६/१२/२०२१ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेकडील पत्र जा.क्र./बाखा/रेशा/वशि/२/२०२३ दि. २४.०४.२०२३ ने गवसे येथील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणेबाबतचे अधिक्षक अभियंता (बांधकाम) यांचे प्रतिस्वाक्षरीचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे गवसे, ता. चंदगड विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१५ :-** विशेष बाब म्हणून मौ.वाडिरत्नागिरी ता.पन्हाळा येथे नवीन प्रा.आ.केंद्र स्थापन करणेबाबत. **(आरोग्य)**

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** मौ.वाडिरत्नागिरी ता.पन्हाळा येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करणेबाबत मान्यता मिळणे बाबतचा विषय आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०५** **दिनांक १६-०५-२०२३**

आरोग्य विभाग अंतर्गत कोल्हापूर जिल्हातील सन २०११ च्या जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करणेकरीता या ठिकाणी नवीन प्रा. आ. केंद्र / उपकेद्र मंजूरी बाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत.

| प्राथमिक आरोग्य केंद्र / नवीन उपकेंद्र नावे | | | |
|---|---|---|---|
| अ नं | उपकेंद्राचे नाव | संस्थेचा प्रकार उपकेंद्र / प्रा. आ. केंद्र | शेरा |
| १ | मौ.वाडिरत्नागिरी ता.पन्हाळा जि.कोल्हापूर | प्रा आ केंद्र | |

सन २०११ ची लोकसंख्या आणि दि १७.०३.२०१७ च्या सुधारीत जोड बृहत आराखडयांचे संचालनायाचे निकषानुसार उपकेंद्राचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्ताव शासनाचे मंजुरीसाठी पाठविणेसाठी मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास पंचायत समिती पन्हाळा सभा दि.२७/०३/२०२३ ठराव क्र.८५१ ने मान्यता दिली आहे.

मौ.वाडीरत्नागिरी ता.पन्हाळा येथे श्री.क्षेत्र जोतिबा देवस्थान असुन वर्षामध्ये चैत्र यात्रा, श्रावण शष्टी यात्रा, प्रत्येक पोर्णिमा व प्रत्येक रविवारी तसेच नवरात्रोत्सव, श्रावण व मार्गशिर्ष महिन्यामध्ये व प्रतिवर्षी दर्शनाकरीता ८० ते ९० लाख भावीक येत असतात त्यामुळे सदर मौ.वाडीरत्नागिरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र खास बाब म्हणून होणेबाबत लोकप्रतिनीधींची, ग्रामस्थांची व भावीकांची मागणी असुन त्यामुळे आरोग्य सेवा वेळेत मिळणार आहे. तरी मौ.वाडीरत्नागिरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर होणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाला असुन आरोग्य समितीची मान्यता मिळावी ही विनंती.

तसेच मौ.वाडीरत्नागिरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर होणेकामी आरोग्य समिती सभा दि.२५/०४/२०२३ ने शिफारस करणेत आली आहे. त्यानुसार स्थायी समिती, जि.प.सर्वसधारण सभेच्या मान्यतेने जिल्हा नियोजस समितीची मान्यता घेऊन शासनाच्या मान्यतोसाठी पाठविणेत येणार आहे तरी स्थायी समितीमध्ये चर्चा होऊन शिफारस करणेत आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१६ :-** कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील गडहिंग्लज तालुक्यातील किल्ले सामानगड येथील विश्राम गृहाच्या विनावापरात असलेल्या इमारती भाडे तत्वावर देऊन विकसीत करणे बाबत. **(बांधकाम)**

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** गडहिंग्लज तालुक्यातील किल्ले सामानगड येथील विश्राम गृहाच्या विनावापरात असलेल्या इमारती भाडे तत्वावर देऊन विकसीत करणे बाबत विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०६** **दिनांक १६-०५-२०२३**

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील मालमत्ता विकसित करून भाडे तत्वावर चालविणेस देऊन किंवा BOT तत्वावर जिल्हा परिषदेच्या महसूल उत्पन्नात भर टाकण्याच्या उद्देशाने बांधकाम विभागाडील मालमत्तांचे सर्वेक्षण करून काही विना वापरा असलेल्या इमारती चालाविनेस देऊन त्यामधून जिल्हा परिषदेच्या महसूल उत्पन्नात भर टाकण्याच्या दृष्टीकोणातून कार्यवाही करणेचे चालू आहे. त्यानुषंगाने , जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. 22.09.2016 ठराव क्रमांक 1213 अन्वये जिल्हा परिषद मालकीची विश्रामगृहे ई- लिलावाने चालाविनेस देनेबाबत बांधकाम विभागाकडून कार्यवाही झालेली असुन त्यामधील किल्ले सामानगड येथील विश्राम गृहाच्या विनावापरात असलेल्या इमारती इत्यादी इमारतींना सरकारी दरांनी झालेल्या ई-लिलावांस प्रतिसाद मिळाला नाही. सदर इमारती आज अखेर विना वापराच पडून असून त्यांवर देखभाल दुरुस्ती इ. बाबींवरील खर्च जिल्हा परिषदेवरच आहे.

दुर्गवीर प्रतिष्ठान सांताक्रुझ मुंबई यांच्या मागणीबाबत किल्ले सामानगड येथील विश्राम गृहाच्या विनावापारात असललेल्या इमारती विषयी चर्चेनुसार सदर इमारत कोणत्याही संस्थेस/ट्रस्टला हस्तांतरित करण्याऐवजी एखाद्या व्यक्तिगत मक्तेदारास दिल्यास जिल्हा परिषदेचे त्यावरील हक्क अबाधित राहतील व सदर इमारत करार संपुष्ठात येताच जिल्हा परिषदेकडे वर्गही करता येईल असे दिसून येते. त्यास अनुसरून, सदर इमारतीची देखभाल दुरूस्ती करून सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने ना नफा ना तोटा या तत्वावर सेवाभावी दृष्टीने चालविण्यासाठी दिल्याने सदर इमारती सुस्थितीत व वापरायोग्य राहणेस मदत

होणार आहे. ही बाब विचारात घेता किल्ले सामानगड ता.गडहिंग्लज येथील डॉमेटरी हॉल, करमणूक सभागृह, यात्री निवास व उपहारगृह या इमारतीची दुरूस्ती संबधीत संस्थेकडून करून घेवून निश्चित केलेल्या भाडयाच्या रक्कमे पैकी ३०% टक्के इतक्या रक्कमेस पहील्या दोन वर्षा करिता व्यवस्थापकिय तत्वावर भाडेणे देता येईल.

उप अभियंता बांधकाम गडहिंग्लज यांनी सदर इमारतीचे भाडे गणनापत्रक दिले आहे. (१)डॉमेटरी हॉल = ५६६९/- (२) करमणूक सभागृह = ५३३४/- (३) यात्री निवास = ६६९९/- (४) उपहार गृह = १९५७/- असे एकूण १९६५९/- होते त्याचे ३०% प्रमाणे भाडे रक्कम रू.५८९८/- इतकी होत तरी. कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील गडहिंग्लज तालुक्यातील किल्ले सामानगड येथील विश्राम गृहाच्या विनावापारात असललेल्या इमारती दुर्गवीर प्रतिष्ठान सांताक्रुझ मुंबई यांना दोन वर्षासाठी पहिल्या वर्षी ३०% प्रमाणे भाडे रक्कम रू.५८९८/- प्रति महीना व त्यानंतर दुसऱ्या वर्षी रू.६४८८/- प्रति महीना दुर्गवीर प्रतिष्ठान सांताक्रुझ मुंबई यांना करारपत्राने चालविण्यास देणेस परवानगी देणे.

तसेच विषयांकित इमारत चालविणेस इतर कोणत्याही सेवाभावी संस्थेने वरिल भाडयाच्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेचे भाडे जिल्हा परिषदेस देणेची सहमती दर्शविलेस त्यानुसार इमारत संबधीत संस्थेस चालविण्यास देणेचे सर्व अधिकार जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे राहतील. सदर विषय जि.प.सभेच्या मंजूरीकरिता ठेवणेस स्थायी समितीने शिफारस केली असून सदरचा विषय या ठरावा व्दारे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस मंजूरी करिता पाठविणेस शिफारस करणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१७ :-** आरोग्य विभागांतर्गत प्रा. आ. केंद्रांसाठी नवीन रुग्णवाहीका खरेदी करणे खर्चास प्रशासकिय मान्यते बाबत **(आरोग्य)**

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** जि.प.आरोग्य विभागांतर्गत प्रा.आ.केंद्रासाठी नवीन रुग्णवाहीका खरेदी करणे खर्चास प्रशासकिय मान्यतेबाबतच्या विषयास जि.प.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यासाठी शिफारस मिळणे विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ज्या गाडयांची जमीनीपासून बेसची उंची जास्त आहे, अशा गाडया घेण्यात याव्यात.

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** हो सर.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०७** **दिनांक १६-०५-२०२३**

सेवा व्यवस्थापक विभागीय कार्यशाळा,आरोग्य सेवा(परिवहन),कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र. जा.क्र. विकाको/तांत्रिक/नविनवाहनखरेदी/०१/२०२३ दि.०२/०१/२०२३ नुसार कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये आरोग्य विभागाकडील प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता नवीन रुग्णवाहीका खरेदी करणेची आहे. सदयस्थितीमध्ये १३ वर्षे पूर्ण झालेल्या रुग्णवाहीकांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन धारक | वाहन क्रमांक | मेक/मॉडेल | वर्षे | कि.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य केंद्र निवडे ता.ग.बावडा | MH-०९ AG ९५४५ | टाटा सुमो रुग्णवाहीका | २००९ | ९८७१२ |
| २ | प्राथमिक आरोग्य केंद्र सावर्डे ता.हातकणंगले | MH-०९ AG ९५११ | टाटा सुमो रुग्णवाहीका | २००५ | १६५०९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव खु. | MH-०९ AG ९५६३ | टाटा सुमो रुग्णवाहीका | २०११ | १५७८७५ |
| ४ | प्राथमिक आरोग्य केंद्र सरवडे ता.राधानगरी | MH-०९ AG ९५६४ | टाटा सुमो रुग्णवाहीका | २०११ | १९२४९७ |
| ५ | प्राथमिक आरोग्य केंद्र इस्पुर्ली ता.करवीर | MH-०९ AG ९५४१ | टाटा सुमो रुग्णवाहीका | २००९ | १५१०१४ |
| ६ | प्राथमिक आरोग्य केंद्र टाकळी ता.शिरोळ | MH-०९ AG ९५४४ | टाटा सुमो रुग्णवाहीका | २००९ | १८३६५१ |

वरील प्रमाणे ६ प्रा.आ.केंद्राकडील रुग्णवाहीका व या आर्थिक वर्षात जसजशा निर्लेखित होणा-या रुग्णवाहीका टप्या टप्याने खरेदी करणेत येणार आहेत. तसेच नव्याने सुरु झालेले प्रा.आ.केंद्र तुरंबे ता.राधानगरी व प्रा.आ.केंद्र कुंभोज ता.हातकणंगले यांना देखील प्रत्येकी एक नवीन रुग्णवाहीका खरेदी करुन पुरविण्यात येणार आहे.

तरी वरील प्रमाणे आरोग्य विभागाकडील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नवीन रुग्णवाहीका खरेदी करणे करीता जिल्हा नियोजन समितीकडून रक्कम रु.३,००,००,०००/- (अक्षरी - तीन कोटी फक्त) इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने वरील प्रमाणे प्रस्तावीत रुग्णवाहीकांसाठी रक्कम रु.१,४४,००,०००/- (अक्षरी - एक कोटी चव्वेचाळीस लाख फक्त) इतक्या व भविष्यात लागणा-या रुग्णवाहीका रक्कमेस प्रशासकिय मान्यता प्रदान करणेस मान्यता मिळणेकामी स्थायी समिती सभेत चर्चा होऊन जि.प.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी शिफारस करणेत आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** आणखीन कोणत्या विभागाकडील विषय असलेस घ्यावेत विषय नसलेस सभा थांबवूया.

**सचिवः-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक सो यांचे परवानगीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपन्न झाली.

**कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला.**

(मनीषा ए देसाई)
सचिव तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, कोल्हापूर

(संजयसिंह चव्हाण)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद,कोल्हापूर